## निवासी व्यक्तींसाठी परदेशी चलन खात्यांची नवी सुविधा
## नोव्हेंबर १, २००२

सध्या भारतातील रहिवासी व्यक्तीला जास्तीत जास्त २००० अमेरिकन डॉलर वा तितके मूल्य असलेली रक्कम रोख व किंवा ट्रॅव्हलर्स चेक्सच्या स्वरुपात स्वतःजवळ ठेवता येते, मात्र ती रक्कम त्या व्यक्तिने खालील मार्गांनी मिळविलेली असली पाहिजे :

(१) भारताबाहेर एखाद्या ठिकाणी गेलेले असताना सेवेचा मोबदला म्हणून,

(२) भारतामध्ये निवासी नसलेल्या किंवा भारतामध्ये आलेल्या व्यक्तीकडून, कोणत्याही वैध स्वरुपाच्या पूर्ततेसाठी,

(३) भारताबाहेर एखाद्या ठिकाणी गेले असताना मानधन किंवा भेट म्हणून,

(४) परदेश प्रवासासाठी एखाद्या अधिकृत व्यक्तीकडून मिळालेल्या रकमेपैकी शिल्लक उरली असल्यास.

निवासी व्यक्तींना उपलब्ध असलेल्या परदेशी चलन सुविधांच्या उदारीकरणाच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल म्हणून असे ठरविण्यात आले आहे, की भारतातील रहिवासी व्यक्तीला एखाद्या अनुज्ञप्तिप्राप्त बँकेमध्ये (जी अधिकृत विक्रेतासुधा असेल) परकीय चलन उघडून चालविण्यास परवानगी द्यावी. हे खाते रेसिडेंट फॉरेन करन्सी (डोमेस्टिक) खाते म्हणून ओळखले जाईल, आणि वर (१) ते (२) मध्ये वर्णिलेल्या कोणत्याही स्त्रोतांद्वारे मिळविलेले परदेशी चलन या खात्यामध्ये निवासी व्यक्तींना ठेवता येईल.

आतापर्यंत निवासी व्यक्तींना वरीलपैकी कोणत्याही स्त्रोतांद्वारे मिळालेले २००० अमेरिकन डॉलरहून अधिक असलेले परदेशी चलन परत करुन ते रुपयांमध्ये परिवर्तित करण्याची सक्ती होती. ही सुविधा सुरु केल्यामुळे निवासी व्यक्तींना वरील प्रमाणे मिळालेले कोणतेही परदेशी चलन किंवा त्याचा भाग रेसिडेंट फॉरेन करन्सी (डोमेस्टिक) खात्यात भरता येईल, किंवा त्यांच्या इच्छेनुसार ते रुपयांमध्ये परिवर्तित करुन रुपयांमधील खात्यात भरता येईल. रेसिडेंट फॉरेन करन्सी (डोमेस्टिक) खाते उघडण्याची ही सोय सध्या उपलब्ध असलेल्या, २००० अमेरिकन डॉलर पर्यंतचे परदेशी चलन रोख नोटा किंवा / आणि ट्रॅव्हलर्स चेक्सच्या स्वरुपात स्वता जवळ ठेवण्याच्या सुविधेच्या व्यतिरिक्त आहे.

रेसिडेंट फॉरेन करन्सी (डोमेस्टिक) खात्यातील शिल्लक रक्कम ही निवासी व्यक्तींसाठीच्या प्रचलित परदेशी चलनविषय नियमांनुसार, परवानगी असलेल्या कोणत्याही उद्देशाने वापरता येईल (उदा. प्रवास, परदेशी वैद्यकीय उपचार, ५००० अमेरिकन डॉलर पर्यंतच्या भेटी, इंटरनेट वरुन किंवा थेट केलेली पुस्तक खरेदी, परदेशी शिक्षण इ.)

जर वर सांगितलेल्या, परवानगी असलेल्या स्त्रोतांद्वारे परदेशी चलन मिळविलेले असेल, तर रेसिडेंट फॉरेन करन्सी (डोमेस्टिक) खात्यातील शिल्लक रकमेवर कोणतीही अधिकतम मर्यादा असणार नाही. हे खाते चालू खात्याच्या स्वरुपात, चेक सुविधेसह चालवता येईल.

सध्याचे परकीय चलनविषयक नियम बदलण्यासाठी आवश्यक त्या अधिसूचना अलगपणे जारी करण्यात येत आहेत. अधिसूचना प्रसिद्ध होईपर्यंत बँकेची प्रादेशिक कार्यालये अशी खाती उघडण्यास तत्परतेने परवानगी देतील.

या नवीन सोयीच्या कार्यांचे एक वर्षाने पुनरावलोकन करण्यात येईल आणि प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करुन या योजनेत आणखी सुधारणा / उदारीकरण केले जाऊ शकेल.

**पी.व्ही सदानंदन**
**व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज : २००२-२००३ /४६**